**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार दिनांक १५ एप्रिल २०२५**

**ठळक बातम्या**

1. **राज्यातल्या नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी क्षेत्रात मालमत्ता करावरचा दंड अंशतः माफ करून कर वसुलीसाठी अभय योजना राबवण्यात येणार.**
2. **राज्यातील २० आय.टी.आय मध्ये अत्याधुनिक प्रयोगशाळा उभारणार, नागपूर आणि अमरावती मधील आय.टी.आयचा यात समावेश.**
3. **शरण आलेल्या नक्षलवाद्यांसाठी गडचिरोली पोलिसांचा नवा उपक्रम 'प्रोजेक्ट संजीवनी'.**
4. **बुलडाणा जिल्हयात रस्ता अपघातात ४ जणांचा मृत्यू, १० जण जखमी.**

**अभय योजना**

राज्यातल्या नगर परिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक नागरी क्षेत्रात, मालमत्ता करावरचा दंड अंशतः माफ करून, कर वसुलीसाठी अभय योजना लागू करण्याचा निर्णय, राज्य सरकारनं घेतला आहे. त्याकरता नगर परिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ मध्ये, आवश्यक सुधारणा करायला, आज मुंबईत झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी मिळाली. कोठडीत कैद्याचा मृत्यू झाल्या प्रकरणी भरपाई देण्याच्या धोरणालाही, आज मंजुरी देण्यात आली. भूमि संपादन, पुनर्वसन आणि पुन-र्वसाहत करताना अधिग्रहीत जमिनींचा मोबदला देताना, विलंब झाल्यास आकारण्यात येणाऱ्या व्याज दरांच्या तरतुदींमध्ये सुधारणा करण्याचा निर्णयही मंत्रिमंडळानं घेतला.

**प्रास्ताविका**

भारतीय संविधानाची माहिती विद्यार्थ्यां पर्यंत रंजक पद्धतीनं पोहोचवण्यासाठी, संविधान सभेतील चर्चा, संविधानाची प्रास्ताविका याचे प्रादेशिक भाषांमध्ये भाषांतर केले जाईल. साहित्य अकादमीच्या माध्यमातून, यावरील पुस्तके सुद्धा विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिल्या जातील अशी माहिती, सांस्कृतिक मंत्रालयाचे सह-सचिव, समर नंदा यांनी नागपूर मध्ये दिली

***कोई एक्टिविटी होता है आप प्रीएम्बल को पढ़ते है। जब आप प्रीएम्बल को पढ़ते है प्रीएम्बल उतने ही वर्ड्स में वो पूरा कॉन्स्टिट्यूशन का स्पिरिट को कैप्चर करते है। तो जब आप प्रीएम्बल पढ़ते है उसमें एक जिज्ञासा आता है। मन में ऐसा क्या चीज़ है कॉन्स्टिट्यूशन में जो कि मुझे ये ताकत देता है।की मैं ऍज अ सिटीजन मेरे पास ये जो फ्रीडम हैं, जो राइट्स हैं और मेरा कुछ ड्यूटीज हैं, वो मैं कैसे निभा तो ये सारे जो है अलग अलग एक्टिविटी के माध्यम से, इसमें हम उनको इन्वॉल्व करते हैं।***

दक्षिण मध्य सांस्कृतिक केंद्र इथं एका कार्यक्रमात करिता आले असता, ते

पत्रकारांशी बोलत होते.

**सांख्यिकी कार्यालय**

व्यक्तिमत्व विकासा बरोबरच, राष्ट्राच्या विकासासाठी शिक्षण हा एक अत्यंत महत्त्वाचा घटक असून, या घटकावर विस्तृत आणि सविस्तर माहिती उपलब्ध असणे गरजेचं आहे. शिक्षण क्षेत्रातील विद्यार्थ्यांचं प्रमाण, शिक्षणावर होणारा प्रत्येक कुटुंबाचा खर्च, विद्यार्थ्यांची शैक्षणिक गळती इत्यादीची माहिती सरकारी स्तरावर उपलब्ध असणे गरजेचं आहे. यालाच अनुसरून, केंद्रीय सांख्यिकी कार्यालय मार्फत, राबविण्यात येणाऱ्या सामा-जार्थिक सर्वेक्षणाच्या 80व्या फेरीमधून ही माहिती संकलित केली जाणार असल्याचं प्रतिपादन, राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय नागपूर विभागीय कार्यालयाचे उप-महासंचालक श्रीनिवास उप्पला यांनी केलं. एन.एस.एस., सामा-जार्थिक सर्वेक्षण 80वीं फेरी संदर्भात एक दिवसीय क्षेत्रीय प्रशिक्षण शिबिराचं उद्घाटन आज, राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, क्षेत्रीय कार्यालय, सी.जी.ओ. कॉम्प्लेक्स, ए-ब्लॉक, तिसरा मजला, सेमिनरी हिल्स, इथं झालं त्यावेळी ते बोलत होते. एन.एस.एस.च्या 80व्या सर्वेक्षण फेरीचे मुख्य लक्ष्य, कुटुंबानं शिक्षणावर केलेल्या खर्चावर राहील. यापूर्वी एन.एस.एस.च्या सर्वेक्षण फेरीनं, टेलिकॉम क्षेत्रात आणि सध्या शिक्षण क्षेत्रात माहिती संकलन करण्यास सुरुवात केली असून, यानंतरचे सर्वेक्षण हे घरगुती पर्यटन संबंधित राहणार असल्याचं त्यांनी सांगितलं. सर्वेक्षण फेरीतून माहिती संकलित केल्या जाईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आणि प्रशिक्षणार्थी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना शुभेच्छा दिल्यात. या प्रशिक्षण शिबिराचे आयोजक, रंगा श्रीनिवासुलु, संचालक, राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, क्षेत्रीय कार्यालय नागपूर हे असून नागपूर इथल्या विभागीय कार्यालयाचे उप-महासंचालक, श्रीनिवास उप्पला हे, या प्रशिक्षण शिबिराचे अध्यक्ष होते.

**आय.टी.आय**

राज्यातील २० आय.टी.आय मध्ये, अत्याधुनिक प्रयोगशाळा उभारणे, सूक्ष्म आणि लघु उद्योजकांना, प्रशिक्षण देण्यासाठी उद्योजक मेळावे आयोजित करून रोजगार निर्मिती करणे, राज्यातील आय.टी.आय.मध्ये, शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या तांत्रिक शिक्षण आणि रोजगार संधी वाढवण्यात येणार आहेत. कौशल्य रोजगार उद्योजकता आणि नावीन्यता विभाग आणि श्री.श्री.ग्रामीण विकास कार्यक्रम ट्रस्ट बेंगलोर, स्नायडर इलेक्ट्रिक इंडिया फाउंडेशन बेंगलोर, पुण्याची दे-आसरा फाउंडेशन, अंधेरी इथल्या प्रोजेक्ट मुंबई या सामाजिक संस्थामध्ये, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आले. या सामंजस्य करारामुळे पुढील चार वर्षात टप्प्याटप्प्याने 9,750 प्रशिक्षणार्थ्यांना इलेक्ट्रिशियन आणि अक्षय ऊर्जा क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान तसंच इंडस्ट्रियल ऑटोमेशन या विषयातील प्रशिक्षणाचा लाभ होणार आहे. राज्यातील विविध विभागांतील, २० शासकीय आय.टी.आय. केंद्रांची निवड करण्यात आली असून, यात मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नाशिक आणि नागपूर इत्यादी विभागांचा समावेश आहे.

**प्रोजेक्ट संजीवनी**

गडचिरोली पोलिसांनी राबवलेल्या विविध लोकोपयोगी उपक्रमांमुळे, प्रभावीत होऊन, शरण आलेल्या नक्षलवाद्यांसाठी पोलिसांनी, प्रोजेक्ट संजीवनी हा नवा उपक्रम सुरु केला आहे. या उपक्रमांतर्गत, शरण आलेल्या नक्षलवाद्यांना, हक्काचं निवासस्थान मिळावं यासाठी, चार रो-हाऊसेस तयार करण्यात येणार आहे. त्याचं भूमिपूजन पोलिस अधीक्षक, नीलोत्पल यांच्या हस्ते काल झालं. राज्य शासनानं, २००५ पासून नक्षल्यांसाठी आत्मसमर्पण योजना सुरु केली. ही योजना आणि गडचिरोली पोलिसांनी राबवलेले लोकोपयोगी उपक्रम बघून, आतापर्यंत ७०४ नक्षल्यांनी, पोलिसांपुढे शरणागती पत्करली आहे. यातल्या बहुतांश जणांचं पुनर्वसन पोलिसांनी केलं आहे.

**पोषण पंधरवडा**

केंद्र सरकार आणि महिला बालविकास मंत्रालयाच्या वतीनं, देशात ७वा पोषण पंधरवडा हि, देशव्यापी मोहीम राबविली जात आहे. या मोहीम संदर्भात, चंद्रपूर जिल्ह्याच्या, ग्रामीण आरोग्य अधिकारी, ज्योती डांगे माहिती देत आहे.

***इस साल के पोषण पंधरवडा में माता और बालकों का पोषण तथा लाभार्थी के लिए डिजिटल सुविधा और मोटापा कम करने पर ध्यान केंद्रित कर रहे हैं। कुपोषण को सौ प्रतिशत  दूर करने के लिए हम केंद्र सरकार के माध्यम से यह पोषण पंधरवडा हम मना रहे हैं।***

**अपघात**

बुलढाणा जिल्ह्यात, खामगाव-नांदुरा रस्त्यावर, आमसरी गावाजवळ, विटांनी भरलेला ट्रक आणि मध्यप्रदेश परिवहन मंडळाची बस यांची, समोरा समोर धडक होऊन झालेल्या अपघातात चार जण जागीच मृत्युमुखी पडले तर, अन्य १० जण गंभीर जखमी झाले आहेत. आज सकाळी नऊच्या सुमारास ही दुर्घटना घडली.

**डॉ. पंकज भोयर**

स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये, पाच टक्के राखीव असलेला, दिव्यांग कल्याण निधी, जागतिक दिव्यांग दिनी, दिव्यांगांच्या खात्यात जमा करण्याचे नियोजन करण्याच्या सूचना, पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी केल्या. वर्धा जिल्हाधिकारी कार्यालयात आज बैठक आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी ते बोलत होते. घरकुल योजनेतही, दिव्यांगासाठी पाच टक्के घरकुल राखीव ठेवण्याचे निर्देश असून, याविषयी प्रकल्प संचालक, ग्रामीण विकास यंत्रणा यांच्या समवेत, बैठक घेऊन, जास्तीत जास्त दिव्यांगाना घरकुल कसे मिळतील, याचं नियोजन करण्यात यावं असं पालकमंत्री म्हणाले.

**आपत्ती प्रतिसाद विषयक सराव**

राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या, पाचव्या बटालियननं आज, राज्यात अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी आणि आपत्ती प्रतिसाद विषयक सराव आयोजित केले होते. पूर, दरडी कोसळणे, भूकंप तसंच रासायनिक अपघातांना त्वरित प्रतिसाद देऊन कृती करण्याच्या या सरावात, १२ विशेष प्रशिक्षित पथकं सहभागी झालेत. येत्या पावसाळ्यासाठी या पथकांची सज्जता तपासणं, हा या मागचा हेतू असून, राज्यातील इतर ठिकाणासह, नागपूरच्या कोंढाळी धरणावर, हे सराव पथकानं सादर केले.

**आंतरराष्ट्रीय दिंडी**

पंढरपूर इथल्या श्रीविठ्ठल रुक्मिणी मंदिर काही वर्षात, लंडन इथं भव्यदिव्य स्वरूपात साकारले जाणार असून, त्यानिमित्तानं, आज पंढरपूर ते लंडन अशी जगातील सर्वात मोठी आंतरराष्ट्रीय दिंडी निघाली आहे. ही दिंडी उदयाला नागपुरात पोहोचत आहे. संध्याकाळी ६ ते ९ या वेळात, विष्णूजी की रसोई, बजाज नगर इथं दिंडीतील पादुका सर्वांच्या दर्शनासाठी ठेवल्या जाणार असून, प्रसाद वितरणाचा कार्यक्रम होईल अशी माहिती, मंदिर समितीचे भारतातील समन्वयक, विष्णू मनोहर आणि मोहन पांडे यांनी कळवलं आहे.

**डिजिटल अरेस्ट**

डिजिटल अरेस्ट प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये सहभाग असल्यामुळे, केंद्रीय अन्वेषण संस्था अर्थात सी.बी.आय.नं चार व्यक्तींना अटक केली. अशा प्रकरणांच्या तपासासाठी सी.बी.आय.नं ऑपरेशन चक्र-व्ही, हे अभियान सुरू केलं असून, त्याअंतर्गत झालेल्या या कारवाईत मुंबई आणि उत्तर प्रदेशातल्या मोरादाबाद इथून प्रत्येकी दोन व्यक्तींना ताब्यात घेण्यात आलं. या चार जणांना न्यायालयानं पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली असून, डिजिटल अरेस्टच्या गुन्ह्यांमागची यंत्रणा उध्वस्त करणं, हा ऑपरेशन चक्र-व्ही, या अभियानाचा उद्देश आहे.

******